| MHKO070010352021 | फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१६७/२०२१ मधील<br>नि.क्र.१४ व १६ वरील एकत्रीत आदेश<br>सुरेखा नाईक वि.तानाजी नाईक |
| --- | --- |

अर्जदार यांनी मूळ अर्ज हा पोटगी रक्कम व ३० ग्रॅम सोन्याचे गंठण अगर त्याची बाजारभावाप्रमाणे होणारी रक्कम वि.प. यांचेकडून वसुल होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. यापुर्वी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.१ व १० यावर एकत्रीत आदेश पारीत करुन वि.प. क्र.१ ते ३ यांचेविरुध्द वसुली वॉरंट काढण्यात आले होते. त्यानंतर नि.क्र.१४ कडे वि.प. यांनी अर्ज दाखल करुन सदरचे वसुली वॉरंट स्थगित करुन मागीतले आहेत. त्यास अर्जदार यांनी म्हणणे दाखल केलेले आहे. तर नि.१६ कडे अर्जदार यांनी अर्ज दाखल करुन फेर वसुली वॉरंट पाठविणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे. त्यास वि.प. यांनी म्हणणे दाखल केलेले आहे.

**०२.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वि. प. यांनी अदयाप पोटगीची रक्कम भरलेली नाही. त्यामुळे निशाणी १४ चा अर्ज नांमजुर करून निशाणी १६ चा मंजूर करून निशाणी १० प्रमाणे फेर वसुली वारंट काढणेत यावे. उलटपक्षी वि. प. यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की अर्जदार यांना अशा प्रकारचा अर्ज देवून एक वर्षापेक्षा जास्त रक्कमेची पोटगी वसूल करून मागता येणार नाही. तसेच सोने मिळणेकरीता वांरट काढता येणार नाही. त्यामुळे निशाणी १४ चा अर्ज मंजूर करून निशाणी १६ चा अर्ज रद्द करणेत यावा.

**०३.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, यापुर्वी अर्जदार व वि.प. यांचे दरम्यान कौटुंबिक हिंसाचार महिला संरक्षण अर्ज कलम १५/१९ मध्ये राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोड झालेली आहे. सदर तडजोडीनुसार वि.प. यांनी अर्जदार यांना पोटगी, नुकसानभरपाई रक्कम व सोन्याचे गंठण देण्याचे ठरले असल्याचे दिसून येते. वि.प. यांचे म्हणण्यानुसार सदरची झालेली तडजोड ही बेकायदेशीर आहे. त्यामुळे त्यांनी सदर तडजोड पुरसीस रद्द होवून मिळणेकरीता दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे

न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८७/२०२१ दाखल केल्याचे कथन केले आहे.

**०४.** अर्जदार यांनी अभिलेखावरील नि.क्र.२५ सोबत मा.उच्च न्यायालय येथे सिव्हिल रिव्हीजन अर्ज क्र.३११/२०२२ मधील न्यायनिर्णयाची प्रत हजर केलेली आहे. अर्जदार यांनी मा.दिवाणी न्यायाधीश व.स्त यांचे न्यायालयात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केला होता तो नामंजूर झाल्यानंतर सदर निर्णयावर अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये रिव्हीजन अर्ज दाखल केला होता. सदर रिव्हीजन अर्जामध्ये मा.उच्च न्यायालयाने, मा.दिवाणी न्यायाधीश व.स्तर जयसिंगपूर यांनी दिवाणी फौजदारी अर्ज क्र.८७/२०२१ मध्ये नि.क्र.१० वर पारीत केलेला आदेश हा रद्द करुन मा.दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे न्यायालयात प्रलंबित असणारा दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८७/२०२१ हा देखील नामंजूर केलेला आहे. शिवाय त्यानुसार दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८७/२०२१ हा निकाली (Dispose off) करणेत आला आहे.

**०५.** एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन करता अर्जामध्ये नमुद असलेल्या एकूण रक्कम रु.२,३१,०००/- पैकी केवळ रु.५,०००/- वि.प. यांनी भरल्याचे दिसून येत आहे. अद्याप रक्कम रु.२,२६,०००/- इतकी रक्कम वि.प. यांचेकडून अर्जदार यांना देय असलेचे दिसून येते. यापुर्वी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.१ व १० वर एकत्रीत आदेश पारीत करुन अलहिदा वि.प. यांचेविरुध्द वसुली वॉरंट काढलेले आहे. तो आदेश अदयाप कायम आहे. अर्जदार व वि.प. यांचेमध्ये दाखल झालेला मूळ अर्ज क्र.१५/२०१९ हा आजतागायत अर्जदार ही पोटगीच्या रक्कमेकरीता वाट पहात आहे. तरी देखील वि.प. यांनी कोणतेही ठोस कारण दाखवून ते पोटगी रक्कम देणेस असमर्थ असल्याचे दाखवले नाही. शिवाय लोक अदालतीमध्ये झालेली तडजोड ही अद्याप कायम आहे. त्यामुळे वि.प. यांचा नि.१४ चा अर्ज नामंजूर करणेत येतो. तसेच वि.प. यांचेविरुध्द यापुर्वी दि.०८/०२/२०२२ रोजी झालेल्या आदेशाप्रमाणे वि. प. यांनी भरलेली रक्कम वजा करता फेर वसुली वॉरंट वि.प. यांचेविरुध्द काढणेत यावे.

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2025.10.17 11:14:07 +0530

**( एम.एस.पाटील )**

दि.१६/१०/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जयसिंगपूर.